सदरक्षणाय खलनिग्रहणाय

महाराष्ट्र शासन
**पोलीस विभाग**
वार्ताहर कक्ष,
पोलीस आयुक्त, यांचे कार्यालय,
डॉ. डी. एन. रोड, मुंबई-४००००१.

दूरध्वनी क्र. २२६२०३३२
Email I.D. – pressroom.mum@mahapolice.gov.in

---

जा.क्र. ६०६/वार्ता.कक्ष/२०२१ दिनांक :- १८/११/२०२१

# —: प्रेस नोट :—

ताडदेव पोलीस ठाणे, मुंबई येथील पोलीस अंमलदार यांनी दिनांक ०५/०९/२०२१ रोजी दिवसपाळी बीट मार्शल ०२ कर्तव्यावर असताना पो.शि.क्र.०९२८६९ रणजित भोसले व पो.शि.क्र.१११३२९ रामेश्वर राठोड ताडदेव पोलीस ठाणे हद्दीत गस्त घालत असताना एक इसम गावठी कट्टा विक्रीसाठी येणार असल्याची गुप्त माहिती मिळाल्यानंतर सतर्क गस्त करीत असताना एका इसमाच्या संशयीत हालचाली दिसून येताच त्याच्याकडे चौकशी केली असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली असता त्यांची अंगझडती घेतली त्यांच्या जवळ गावठी कट्टा व दोन जिवंत काडतुसे सापडली. सदर संशयित इसमास त्वरित पोलीस ठाणे येथे आणुन वि.स्था. गु.र.क्र. २५/२०२१,गकलम ३,२५ भा.ह.का. अन्वये नोंद करून आरोपीस अटक करुन गुन्हा उघडकीस आणुन ताडदेव पोलीस ठाणे, मुंबई मधील पोलीस अंमलदार यांनी चांगली कामगिरी करून प्रशंसनीय कामगिरी केली व जनमाणसातील मुंबई पोलीसांची प्रतिमा उंचविण्याचे सर्वोत्कृष्ट कार्य केले आहे.

यांनी केलेल्या या प्रशंसनीय व उल्लेखनीय कामगिरीबद्दल दि.१६/११/२०२१ रोजी १६.३० वा मा. श्री विश्वास नांगरे पाटील, पोलीस सह आयुक्त (का व सु), बृहन्मुंबई यांनी, वाय.एम.सी.सभागृह, आग्रीपाडा, मुंबई येथे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ ३ मुंबई अंतर्गत पोलीस अधिकारी व अंमलदार यांना विशेष पारितोषिक व प्रशस्तीपत्र देऊन गौरव केलेला आहे. सदर वेळी मा.श्री.ज्ञानेश्वर चव्हाण, अपर पोलीस आयुक्त, मध्य प्रादेशिक विभाग, मा.श्री.परमजीत सिंग दहिया, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, यांचे उपस्थितीत सोहळा पार पडला.

(चैतन्या एस.)
पोलीस उप आयुक्त (अभियान),
जनसंपर्क अधिकारी,
पोलीस आयुक्त कार्यालय, मंबई

Scanned with CamScanner



Scanned with CamScanner